# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 7.139

Peer Reviewed Journal



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

Publisher
Shaurya Publication

2019-2020
C-III(1)

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2020 Special Issue – 236 (D)

## Introspection, Prognosis and Strategy for Global Water Resources



**Guest Editor :**
Dr. Devidas S. Gejage
I/C Principal,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Executive Editors :**
Mr. Santosh P. Mane
IQAC Cordinator
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2020 Special Issue – 236(D)

# Introspection, Prognosis and Strategy for Global Water Resources

Guest Editor :
Dr. Devidas S. Gejage
I/C Principal,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

Executive Editors :
Mr. Santosh P. Mane
IQAC Cordinator
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 236 [D] : Introspection Prognosis and Strategy for Global Water Resources
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
January-2020

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
SPH Mahila Mahavidyalaya,
Malegaon, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625, | January-2020
Special Issue 236 [D] : Introspection Prognosis and Strategy for Global Water Resources
Peer Reviewed-Referred Journal

# INDEX



| No. | Title of the Paper Name | Author's | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | पाणी और उसकी समस्या | प्रा.दत्तात्रय साळवे | 06 |
| 2 | हिंदी साहित्य में चित्रित जल समस्या | डॉ.कांचन घाडगे | 09 |
| 3 | पानी के प्राचीर में चित्रित जल प्रकृती | डॉ.सुब्राव जाधव | 12 |
| 4 | हिंदी यात्रा साहित्य चित्रित जल प्रकृति | डॉ.विक्रम पवार | 16 |
| 5 | हिंदी कविता में चित्रित अकाल | तयाजी लोंढे | 20 |
| 6 | नासिरा शर्मा कृत उपन्यास 'कुइयँजान' में वर्णित जल समस्या | प्रा. किसन वाघमोडे | 23 |
| 7 | जीवन और साहित्य में जल का महत्त्व | प्रो.सौ.सुरैय्या शेख | 28 |
| 8 | वर्तमान जल समस्या एवं मध्यकालीन साहित्य में जल का महत्त्व | प्रा. कु. आशा गायकवाड | 30 |
| 9 | भारत में जल समस्या | डॉ.ज्योती गायकवाड | 33 |
| 10 | राष्ट्रीय जलजाळ्याचे नियोजन आणि विकास | डॉ.हरी वाघमारे | 36 |
| 11 | अहेर तालुक्यातील जलसिंचनाची क्षमता | डॉ.नागसेन मेश्राम | 40 |
| 12 | महाराष्ट्रातील जलप्रणाली एक भौगोलिक अभ्यास | प्रा.कलंदर पठाण | 46 |
| 13 | जलयुक्त शिवार अभियान : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.एन.बी.कराळे | 51 |
| 14 | सातारा जिल्ह्यातील कृषी विकासावर सिंचन पध्दतीचा झालेल्या प्रभावाचा भौगोलिक अभ्यास | विशाल घोलप व डॉ.डी.बी.नलावडे | 54 |
| 15 | महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रातील पाणीटंचाई | डॉ.अरविंद कदम | 59 |
| 16 | सातारा जिल्ह्यातील जलसिंचन स्त्रोताचा अभ्यास | डॉ. दशरथ बंदुके , सौ.सुवर्णा बंदुके | 64 |
| 17 | सोलापूर जिल्ह्यातील विविध साधनांनी ओलिताखाली असलेले तालुकानिहाय क्षेत्र सन २०१०-११ | डॉ.सि.बी.लोंढे | 73 |
| 18 | उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध पिकाखालील क्षेत्र : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.महेबूबपाशा शिरमाळे | 78 |
| 19 | जलव्यवस्थापन – कठोर जलनीती काळाची गरज | डॉ.सुभाष गायकवाड | 82 |
| 20 | तापवृद्धीचा नागरी हवामानावर होणारा परीणाम – भौगोलिक अभ्यास | मयुरी ठाकरे | 85 |
| 21 | शेततळे : शाश्वत सिंचनाचा प्रभावी मार्ग | डॉ.एस.डी.काळे | 90 |
| 22 | नांदेड जिल्ह्यातील आदिवासी कामगारांचा भौगोलिक अभ्यास | आनंदा देवकर व एस.व्ही.ताठे | 93 |
| 23 | सह्याद्री व्याघ्र प्रकल्प-पर्यटकांचे नवे आकर्षण | सौ.शकुंतला शिंदे | 97 |
| 24 | भारतातील वन साधनसंपत्तीचा भौगीलिक अभ्यास | डॉ.दयानंद उजळंबे | 100 |
| 25 | भारतीयांचे प्राचीन काळातील जलव्यवस्थापन | डॉ.सुभाष गायकवाड | 104 |
| 26 | वाढती लोकसंख्या : मर्यादित पाणी | अर्चना दोंडे | 107 |
| 27 | जलप्रदूषण : एक भीषण समस्या | रामानंद दोंडे | 109 |
| 28 | उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकसंखेचे लिंग गुणोत्तर आणि आजारांचा चिकित्सक अभ्यास | डॉ.के.एल.कदम | 111 |
| 29 | जल में अर्सेनिक की समस्या एक अध्ययन | डॉ. शेख ए.आय | 119 |
| 30 | पाण्याची गुणवत्ता,जलप्रदूषण नियंत्रण व उपाय | प्रा.मनिषा कळसकर | 121 |
| 31 | जल साक्षरता" काळाची गरज | प्रा.संजयादेवी पवार (गोरे) | 126 |
| 32 | बीड जिल्ह्यातील लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पातील जलसंसाधन व स्त्रोत यांचा अभ्यास | डॉ.एम.जी.राजपंगे व सर्वेश्वर कोठुळे | 130 |
| 33 | माळशिरस मधील दुर्मिळ वीरगळ | डॉ.संजय वाघमारे | 137 |

ISSN : 2348-7143
January-2020

# भारतातील वन साधनसंपत्तीचा भौगोलिक अभ्यास -प्रा. डॉ. दयानदं उजळंबे

**प्रा.डॉ. दयानंद उजळंबे**
उपप्राचार्य, तथा भूगोल विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गंगाखेड. जि.परभणी.
Email: dgujalambe@rediffmail.com

**सारांश :**

संपूर्ण जगात वनसंपदेच्या भंडारामुळेच मानवाला आणि सर्व जिवाला ऑक्सीजनचा पुरवठा होत असतो. जगात ॲमेझॉन खोऱ्यात 2.2 मिलीयन चौ.कि.मी., तर तैगा प्रदेशात जगात सर्वात अधिक वनक्षेत्र असून भारताचा वनक्षेत्रात जगात दहावा क्रमांक लागत असून, भारत देशाच्या राष्ट्रीय वन-नितीनुसार 33% वनक्षेत्र असणे गरजेचे आहे पण प्रत्यक्षात 21.54% वनक्षेत्र शिल्लक असून ते ही उत्तर-पूर्व राज्य, पश्चिम घाट आणि अन्य प्रदेशात मर्यादित असून पंजाब, हरियाना, राजस्थान, गुजरात, उत्तरपद्रेश, बिहार राज्यात वनक्षेत्र कमी असणं पर्यावरणाच्या आणि जैवविविधतेच्या दृष्टीने धोक्याचे असून केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, राज्याचा वन विभाग, स्वयंसेवी संस्था, पर्यावरणावर काम करणाऱ्या व्यक्तीच्या सकारात्मक कामामुळे भारतात 0.21% वनक्षेत्र वाढले असून, ते समाधानकारक नसले तरी वनवृद्धेची पहिले पाऊल आहे. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतातील वनक्षेत्रात जो बदल झालेला आहे, तो किती प्रमाणात झालेला आहे, वनधोरण काय आहे याबद्दलचे विश्लेषण आणि निष्कर्ष काढलेले आहेत.

**अ) प्रस्तावना :**

भारतातील वन संपदाचे वितरण आणि बदल कशा पद्धतीने झालेली आहेत. राज्यात राष्ट्रीय वननितीनुसार 33% वनक्षेत्र असणं आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात वनक्षेत्र खुपच कमी दिसून येते विशेषतः राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश, बिहार राज्यात आणि दमन आणि दिव केंद्रशासीत प्रदेशामध्ये वनक्षेत्र मर्यादित आहेत त्या पाठीमागचे भौगोलिक आणि मानवनिर्मित कोणते कारण आहेत, तर मध्यप्रदेश, उत्तरपूर्व भारतात वनक्षेत्राचे प्रमाण प्राप्त आकडेवारीनुसार अधिक असल्याचे निदर्शनास येते. केंद्रीय पर्यावरण विभाग, राष्ट्रीय वननिती, वनासंदर्भातील कायदा, राजकिय व्यक्तींची इच्छाशक्ती, वनासंदर्भात समाजामध्ये असलेली जागरुकता, पर्यावरण संतुलनात वनाची असलेली महत्त्वपूर्ण भूमिका, वनसंवर्धन आणि वृक्षलागवड करण्यासाठी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थेने आणि व्यक्तीने केलेले महत्त्वपूर्ण प्रयत्न त्यामुळे वनक्षेत्रात झालेली वाढ महत्त्वाची आहे. वनक्षेत्र वाढीसाठीचा धोरणात्मक, चिरकाल धोरण कसे असावे आणि त्या माध्यमातून वनक्षेत्र वृद्धी आणि पर्यावरण, जैवविविधतेचे संवर्धन, मानवाचा आर्थिक विकास कसा होईल, पर्यावरण आणि मानवी क्रीया यांच्यामध्ये समन्वय, त्यातून वनक्षेत्र वृद्धी कशी होईल हा प्रस्तूत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**ब) संज्ञा :**

राष्ट्रीय वननिती, वनसंरक्षण कायदा, चिरकाल संवर्धन आणि विकास, वन-मानव समायोजन, जैवविविधता संवर्धन.

**क) उद्देश :**

1. भारतातील प्राप्त वनक्षेत्राची माहिती जाणून घेणे.
2. वनक्षेत्रामध्ये झालेला बदल आणि कारणांचा अभ्यास करणे.
3. वनक्षेत्रासंदर्भात दिर्घकालीन धोरणाचा अभ्यास करणे.

**ड) अभ्यास पद्धती आणि सांख्यीकीय माहिती:**

भारतातील वनक्षेत्राचे प्रमाण किती आहे यासाठी वेगवेगळ्या संस्थेने, शासनाने प्रकाशित केलेल्या दुय्यम आकडेवारी एकत्रित करुन त्याचे पृथःकरण करण्यात आले. पृथःकरण केलेल्या आकडेवारीचे विश्लेषण करुन आलेखीय पद्धतीच्या सहाय्याने ते प्रदर्शीत केले. यासाठी प्रस्तूत आकडेवारी केंद्रीय वन आणि पर्यावरण विभाग, राज्यांचे वनासंदर्भातील संकेत स्थळे, अनेक एजन्सीज्ने प्रकाशित केलेली आकडेवारी, सांख्यीकीय विभाग, यांच्याकडून दुय्यम प्रकारची आकडेवारी जमा करुन भारतातील वनसाधनसंपत्तीचे सद्यस्थिती, त्यामध्ये झालेला बदल, त्या बदलाचा मानवी जीवनावर आणि निसर्गावर पडणारा प्रभाव, त्यातून निर्माण होणारे अवर्षण (दुष्काळ), पुर, पाण्याची टंचाई, जैवविविधतेचे होणारे अतोनात नुकसान, या संदर्भात दिर्घकालीन निष्कर्ष प्रस्तूत अभ्यास पद्धती आणि आकडेवारीच्या विश्लेषणातून निष्कर्ष काढलेले आहेत. प्रस्तूत शोधनिबंधासाठी प्राथमिक आकडेवारीचा उपयोग केलेला नाही.

**इ) विश्लेषण :**

भारतातील वनसंपदेचा भौगोलिक अभ्यास करत असताना सारणी क्र.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारतात 2015 मध्ये वन विभागाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार भारतात सरासरी वनक्षेत्र 21.54% असून वनक्षेत्रामध्ये 2015 च्या आकडेवारीनुसार 0.21% वाढ झालेली आहे. ही वाढ पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने समाधानकारक असली तरी राष्ट्रीय वननिती नुसार 33% वनक्षेत्र असणे गरजेचे असून आणखीन किमान 11.46% वनक्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. विशेषत:

**सारणी क्र.1**
**भारतातील राज्यनिहाय आणि केंद्रशासीत प्रदेशातील वनक्षेत्र (%) मध्ये**

| अ. क्र. | राज्य / केंद्रशासीत प्रदेश | वनक्षेत्र | वनक्षेत्रातील बदल %मध्ये | अ. क्र. | राज्य / केंद्रशासीत प्रदेश | वनक्षेत्र | वनक्षेत्रातील बदल %मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंध्रप्रदेश | 17.27 | +1.31 | 20 | नागालँड | 75.33 | -2.71 |
| 2 | अरुणाचल प्रदेश | 79.96 | -0.23 | 21 | ओरीसा | 32.98 | +0.57 |
| 3 | आसाम | 35.03 | +0.72 | 22 | पंजाब | 3.65 | +0.13 |
| 4 | बिहार | 7.15 | +0.05 | 23 | राजस्थान | 4.84 | +0.14 |
| 5 | छत्तीसगड | 41.09 | -0.01 | 24 | सिक्कीम | 47.13 | -0.13 |
| 6 | दिल्ली | 12.97 | +0.25 | 25 | तामिळनाडू | 20.21 | +0.06 |
| 7 | गोवा | 60.21 | +0.51 | 26 | तेलंगना | 18.22 | +0.50 |
| 8 | गुजरात | 7.52 | +0.02 | 27 | त्रिपुरा | 73.68 | -1.56 |
| 9 | हरियाणा | 3.59 | +0.02 | 28 | उत्तरप्रदेश | 6.09 | +0.12 |
| 10 | हिमाचल प्रदेश | 27.12 | +0.71 | 29 | उत्तराखंड | 45.43 | +0.04 |
| 11 | जम्मू-कश्मीर | 10.46 | +0.11 | 30 | प. बंगाल | 18.98 | +0.02 |
| 12 | झारखंड | 29.55 | +0.04 | 31 | अदमान निकोबार | 81.73 | -0.11 |
| 13 | कर्नाटक | 19.58 | +0.57 | 32 | चंदीगड | 18.91 | -0.09 |
| 14 | केरळ | 52.30 | +2.68 | 33 | दादर | 42.16 | +0.20 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आणि हवेली | | |
| 15 | मध्यप्रदेश | 25.11 | 00 | 34 | दमन आणि दिव | 18.16 | +0.79 |
| | | | | 35 | लक्षद्विप | 90.33 | +0.13 |
| 16 | महाराष्ट्र | 16.47 | +0.01 | 36 | पाँडेचरी | 10.95 | -0.67 |
| 17 | मणिपूर | 77.69 | +1.18 | | भारत | 21.54 | +0.21 |
| 18 | मेघालय | 76.76 | -0.52 | | | | |
| 19 | मिझोराम | 86.27 | -2.52 | | | | |

संदर्भ : वन विभाग, भारत सरकार

विशेषतः पंजाब (3.65%), हरियाणा (3.59%), राजस्थान (4.84%), उत्तरप्रदेश (6.09%), गुजरात (7.52%), बिहार (7.75%), राज्यात आणि पाँडेचरी (10.95%) केंद्रशासीत प्रदेशामध्ये वनक्षेत्र नगण्य असल्याचे दिसते.

देश स्वातंत्र्य झाल्यानंतर हरित क्रांती आणि त्यातून कृषी उत्पन्नामध्ये वाढ करण्यासंदर्भात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून भारताचे ध्येय असल्यामुळे पंजाब आणि हरियाणा राज्यात वनक्षेत्र पूर्वीपासून खुपच कमी राहिले, राजस्थानमध्ये वाळवंटी प्रदेशामुळे तर गुजरातमध्ये कच्छच्या रणमुळे वनक्षेत्र कमी दिसते. तर उत्तरप्रदेश, आणि बिहारमध्ये लोकसंख्येची घनता जास्त असल्यामुळे वनक्षेत्र घटले. पाँडेचरी केंद्रशासीत प्रदेशामध्ये शहराचा आकार वाढला आणि त्यामुळे वनक्षेत्र घटले. विशेषतः वनक्षेत्रामध्ये जो नकारात्मक बदल झाला त्यात उत्तरपूर्व राज्य येतात. मेघालय (-0.52%) मिझोराम (-2.52%), नागालँड (-2.71%), त्रिपुरा (-1.56%), सिक्कीम (-0.13%). स्लॅश ॲन्ड बर्न ॲग्रीकल्चरमुळे (स्थलांतरीत शेतीमुळे) वनावर आधारीत लोकांचे मानवी जीवन अवलंबून असल्यामुळे दिवसेंदिवस वनक्षेत्र घटते आहे. आधूनिक काळात कृषी लागवडीखालील क्षेत्र वाढत असल्यामुळेही वनक्षेत्र घटत आहे. हे पर्यावरणाच्या दृष्टीने घातक आहे.

**ई) निष्कर्ष :**

1) 2015 च्या वनविभागाच्या आकडेवारीनुसार भारतात सरासरी 0.21% वनक्षेत्रामध्ये वाढ झाली आहे.
2) उत्तरपूर्वेकडील राज्यामध्ये वनक्षेत्रामध्ये घट झालेली असून बाकीच्या बहूसंख्य राज्यात वनक्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे.
3) अंदमान निकोबार, चंदिगड, पाँडेचरी केंद्रशासीत प्रदेशात वनक्षेत्र घटले असून दिल्ली, दादर आणि नगर हवेली, दमन आणि दिव, लक्षद्विप केंद्रशासीत प्रदेशात वनक्षेत्रात वाढ झालेली आहे.
4) महाराष्ट्रात वनक्षेत्रामध्ये 0.01% वाढ झालेली आहे.

**उ) उपाय योजना :**

भारतातील वनक्षेत्राचा राज्यनिहाय आणि केंद्रशासीत प्रदेशाचा अभ्यास केला असता भारतातील बहूतांश राज्यात वनक्षेत्र वृद्धी होत आहे. ही जमेची बाजू असली तरी ज्या गतीने वनक्षेत्रामध्ये वाढ होणे गरजेचे आहे ती झाली नाही. विशेषतः उत्तरपूर्व राज्यात स्थलांतरीत शेतीमुळे वनक्षेत्रामध्ये तिव्र घट झालेली असून वन कायदा कठोर करणे, वनक्षेत्र वृद्धीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान देणे, पर्यावरण क्षेत्रात विशेषतः वृक्ष लागवड करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे, शासन आणि प्रशासनामार्फत वनक्षेत्र वृद्धीसाठी प्रचार आणि प्रसार करणे, शेतकऱ्यांना वृक्ष असणाऱ्या शेतीची आकडेवारी पाहून पेन्शन देणे, फळ आधारित शेतीला अनुदान देणे.

ISSN : 2348-7143
January-2020

संदर्भ :

www.https://en.wikipedia.org
www.https://firenvis.nic.org
www.https://fsi.nic.in
www.https://data.gov.in
www.https://india.gov.in
forest survey of India (fsi) report (2015)
India State of forest report (2017)